# आंतर विद्यापीठ व्हॉलीबॉल स्पर्धेसाठी निवड

**देगलूर/ प्रतिनिधी**

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,नांदेड येथे मुलींचे विद्यापीठीय व्हॉलीबॉल अंतिम निवड चाचणी झाली. यात देगलूर महाविद्यालय,देगलूरच्या समरता इबितदार व सपना अल्लापूरकर यांची सावित्रीबाई फुले विद्यापीठ पुणे अंतर्गत कोपरगावमध्ये होणाऱ्या आंतर विद्यापीठीय व्हॉलीबॉल मुलींच्या संघात निवड झाली आहे.



या स्पर्धेत स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,नांदेडच्या व्हॉलीबॉल संघाचे प्रतिनिधित्व त्या दोघी करणार आहेत. प्रशिक्षक डॉ.निरजकुमार उपलंचवार यांचे मार्गदर्शन लाभले आहे. या खेळाडूंचे अभिनदंन अडत व्यापारी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रकाश पाटील बेंबरेकर, संस्थेचे सचिव शशिकांत चिद्रावार ,उपाध्यक्ष नारायणराव मैलागिरे, सहसचिव सुर्यकांत नारलावार, कोषाध्यक्ष विलास तोटावार व कार्यकारिणी मंडळ सदस्य राजूकुमार महाजन, डॉ कर्मवीर उनग्रतवार , देवेंद्र मोतेवार , गंगाधर जोशी, जनार्दन चिद्रावार, रवींद्र द्याडे. चंद्रकांत नारलावार, प्राचार्य डॉ. अनिल चिद्रावार, उपप्राचार्य निवृत्ती गोविंदवार ,प्रसिद्धी प्रमुख डॉ.बी.आर .कत्तूरवार,पर्यवेक्षक प्रा. संग्राम पाटील , कार्यालय अधीक्षक गोविंद जोशी नळगीरकर यांनी कौतुक केले ओह.